आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२६ जुलै २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मालदीवच्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याला उपस्थित राहून आज मायदेशी परतणार

- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज तमिळनाडूमधे ४ हजार ६०० कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण

- देशभर कारगिल विजय दिनानिमित्त विविध कार्यक्रमातून कारगिल हुतात्म्यांना अभिवादन

- संसदेत येत्या सोमवारी ऑपरेशन सिंदूरविषयी चर्चा

- **आणि**
- फिडे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत दोन भारतीय खेळाडूंमधे विजेतेपदासाठी आज लढत

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मालदीव्जचे उपराष्ट्राध्यक्ष हुसैन मोहम्मद लतीफ यांची भेट घेऊन चर्चा केली. परराष्ट्रव्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोवाल तसंच परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री त्यांच्यासोबत होते.

प्रधानमंत्र्यांनी मालदीव्जचे माजी प्रधानमंत्री आणि माजी राष्ट्राध्यक्षांचीही भेट घेतली. मालदीव्जचा हीरकमहोत्सवी स्वातंत्र्यदिन आज साजरा होत असून, त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मालदीव्जच्या नागरिकांना त्यांनी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

- **- होल्ड - बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी- -**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनीही मालदीवच्या नागरिकांचं अभिनंदन केलं. भारत - मालदीव राजनैतिक संबंधांना यंदा ६० वर्षं पूर्ण होत असून भारत-प्रशांत महासागर क्षेत्रात शांतता, समृद्धी आणि स्थैर्य राखण्याच्या दृष्टीनं हे संबंध आणखी बळकट करायला भारत वचनबद्ध आहे, असंही जयशंकर म्हणाले.

मालदीव्जचे राष्ट्राध्यक्ष मुईज्झु यांनी मोदी यांच्या सन्मानार्थ काल विशेष समारंभाचं आयोजन केलं होतं. यावेळी उभय देशांदरम्यान विविध सामंजस्य करारही करण्यात आले. त्याविषयी आमच्या प्रतिनिधीनं माहिती दिली.

**... होल्ड - व्हॉईसकास्ट- जीवन भावसार- -**

मालदीव्जचा दौरा आटोपून प्रधानमंत्री आज मायदेशी परतणार आहेत.

**<><><><>**

मालदीव दौऱ्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी दोन दिवसांच्या तमिळनाडू दौऱ्यासाठी तुतिकोरीन इथं पोहोचतील. तुतिकोरीन विमानतळाच्या नव्या टर्मिनल इमारतीचं उद्घाटन ते करतील. तसंच ४ हजार ६०० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. अरियालूर जिल्ह्यातल्या गंगईकोंडा चोलापुरम मंदिरात चोल सम्राट राजेंद्र चोल पहिले यांच्या स्मरणार्थ आयोजित आदि थिरुवादिरई उत्सवातही प्रधानमंत्री सहभागी होतील. राजेंद्र चोल यांनी आग्नेय आशियावर समुद्रमार्गानं केलेल्या चढाईला १ हजार वर्षं पूर्ण झाल्याच्या, तसंच चोल स्थापत्यकलेचा उत्तम नमुना असलेल्या गंगईकोंडा चोलापुरम मंदिराच्या बांधकामाला सुरुवात झाल्याच्या स्मरणार्थ हा उत्सव आयोजित केला जातो.

**<><><><>**

देशभर आज कारगिल विजय दिवस साजरा होत आहे. **राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांनी आज कारगिल विजय दिनानिमित्त देशासाठी बलिदान देणाऱ्या शूर सैनिकांना आदरांजली वाहिली. हा दिवस देशाच्या सैनिकांचं असाधारण शौर्य, धैर्य आणि दृढनिश्चयाचं प्रतीक आहे, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**प्रधानमंत्री** नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना कारगिल विजय दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. आजच्या दिवशी, देशाच्या आत्मसन्मानाचं रक्षण करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या भारत मातेच्या वीर सुपुत्रांचं आपण स्मरण करतो असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

लडाखमध्ये, २६ व्या कारगिल विजय दिवस सोहळ्याचा भाग म्हणून, कारगिल युद्धातल्या वीरांना आदरांजली वाहण्यासाठी आज सकाळी द्रासमध्ये एक भव्य पदयात्रा

आयोजित करण्यात आली होती. या पदयात्रेत तरुण, माजी सैनिक, सशस्त्र दलाचे कर्मचारी, शहीद जवानांचे कुटुंबीय आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

केंद्रीय युवा कल्याण आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय आणि संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांनी पदयात्रेचं नेतृत्व केलं.

**संरक्षण मंत्री** राजनाथ सिंह यांनी आज कारगिल विजय दिना निमित्त नवी दिल्ली इथल्या राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून वीर जवानांना आदरांजली वाहिली. भारतीय लष्कराच्या वीर जवानांनी कठीण परिस्थितीतही देशाच्या सन्मानाचं रक्षण करताना असाधारण धैर्य आणि दृढनिश्चय दाखवला, असं ते यावेळी म्हणाले.

**लष्करप्रमुख** जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी आज २६ व्या कारगिल विजय दिनानिमित्त कारगिल युद्ध स्मारकात शहीद जवानांना आदरांजली वाहिली. कर्तव्य बजावताना प्राणांची आहुती देणाऱ्या योद्ध्यांच्या कुटुंबियांना संपूर्ण देश सलाम करतो, असं ते यावेळी म्हणाले.

संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह, संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान, हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए पी सिंग आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी यांनीही आज कारगिल विजय दिनानिमित्त देशाच्या वीर जवानांना आदरांजली वाहिली.

**<><><><>**

संसदेत येत्या सोमवारी ऑपरेशन सिंदूरविषयी चर्चा होणार असल्याची माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांना काल माध्यमांशी बोलताना दिली. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली संसदीय कामकाज समितीच्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आल्याचं ते म्हणाले. संसदेच्या दोन्ही सभागृहात यावर चर्चा होणार असून त्यासाठी १६ तास देण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोग चालवण्याचा प्रस्ताव एकमताने मांडला जावा यावर बैठकीत एकमत झाल्याचं रिजिजू यांनी सांगितलं.

**<><><><>**

आयुष्मान आरोग्य मंदिर आणि राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत केंद्रसरकारने देशभरातल्या १० कोटी १८ लाखापेक्षा जास्त महिलांची सर्व्हायकल कॅन्सर, म्हणजेच, गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची तपासणी केली आहे. असंसर्गजन्य आजारांची तपासणी,

प्रतिबंध आणि व्यवस्थापनासाठी लोकसंख्या-आधारित उपक्रमाचा हा एक भाग असल्याचं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

हा उपक्रम ३० ते ६५ वर्ष वयोगटातल्या महिलांवर लक्ष केंद्रित करत असून, कर्करोगाचं निदान करण्यासाठी दोन टप्प्यांमध्ये चाचणी केली जाते. ही कामगिरी आयुष्मान आरोग्य मंदिरांच्या माध्यमातून व्यापक आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा पुरवण्या-प्रति सरकारची वचनबद्धता दर्शवत असल्याचं आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><>

झारखंडच्या गुमला जिल्ह्यात आज सकाळी पोलिसांशी झालेल्या चकमकीत जनता जन मुक्ती पार्टी या बंदी घातलेल्या नक्षलवादी संघटनेचे तीन सदस्य ठार झाले. या तिघांचे मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेतले. तसंच या ठिकाणावरून एके-४७ आणि इनसास रायफल्सही जप्त केल्या.

<><><><>

फिडे महिला बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेची अंतिम लढत आज भारताच्या दोन ग्रँडमास्टर्स, कोनेरू हंपी आणि दिव्या देशमुख यांच्यात रंगणार आहे. या स्पर्धेचं जेतेपद आणि उपविजेतेपदही भारताकडे येणार आहे. या स्पर्धेत जिंकणारी बुद्धिबळपटू पुढच्या वर्षीच्या फिडे महिला कँडिडेट्स टूर्नामेंटमध्ये जागतिक अजिंक्यपदासाठी जू वेंजून हिला आव्हान देईल. भारताच्या बुद्धिबळातल्या वाटचालीतला हा एक ऐतिहासिक टप्पा ठरला आहे.

<><><><>

अँडरसन - तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्यात काल तिसऱ्या दिवशी यजमान इंग्लंडनं पहिल्या डावात भारतावर १८६ धावांची आघाडी घेतली आहे. कालचा खेळ थांबला तेव्हा इंग्लंडने आपल्या पहिल्या डावात ७ गडी गमावून ५४४ धावा केल्या.

//<><><><>//